Golden Research Thoughts ISSN 2231-5063
Volume-3, Issue-1, July-2013

# महाराष्ट्रातील शहरी भागात शहरी पक्षांची घसरण (शिवसेना, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

संजय लांडगे
डॉ. बी.एन.पी. कला, एस.एस.जी.जी. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोणावळा, पुणे

***शोध सारांश*** : 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. स्थानिक शासन संस्थ्यांच्या निवडणुकांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवे बदल होउु लागले आहेत. सुरवातीच्या काळात दोनच पक्षांमध्ये राजकीय स्पर्धा दिसून येत होती. उदा. कॉग्रेस पक्ष व भारतीय जनता पक्ष. परंतु नंतर या दोन पक्षांमध्ये कोणत्याही एका पक्षास विधीमंडळ, महानगरपालीका, नगरपालीका, जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये बहुमत प्राप्त करू शकता आले नाही. सन 2002 आणि 2007 च्या स्थानिक शासन संस्थेच्या निवडणुका झाल्या होत्या तेंव्हा कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस, शिवसेना व भारतीय जनता पक्ष अशी चौरंगी राजकीय स्पर्धा हाती. परंतु या चौरंगी राजकीय स्पर्धेच्या आघांडयामुळे द्विध्रुवीयकरण झालेले दिसून येते.

***प्रस्तवाना –***

महाराष्ट्राच्या राजकारणात शहरी व ग्रामीण राजकारण असा भेद दिसून येतो. ग्रामीण भागातूनच कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस या पक्षांचा उदय झालेला आहे तर भारतीय जनता पक्ष, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षांनी शहरी भागात उदयाची पार्श्वभूमी निर्माण केली आहे. परंतू आज शहरी राजकीय प्रक्रियेत मोठे बदल झालेले आहेत. उदा. औद्योगिकीकरण, शहरीकरण, उद्योगधंद्याची वाढ, सेवा क्षेत्रातील वाढ मोठया प्रमाणात ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेली लोकसंख्या वाढत गेली आणि शहराचा काही भाग हा झोपडपट्टी वसाहतींनी निर्माण होत गला. त्याचा परिणाम हा शहरी राजकारणावर पडलला दिसतो.

महाराष्ट्रामध्ये राजकारण 1990 च्या दशकात बदलत गेलेले दिसून येते. ग्रामीण राजकीय सत्तेच्या केंद्रीयकरणाचे जाळे हे शहरी राजकीय सत्तेकडे विकेन्द्रीत झालेले आहे. 21 व्या शतकाच्या सुरवातीच्या दशकात शहरीकरण व औद्योगिकीकरण या प्रक्रिया वाढलेल्या आहेत. त्यामुळे शहरी भागातील अर्थकारण देखील परिवर्तन होउु लागले आहे. परिणामतः शहरी राजकारणाची राजकीय समिकरणे बदलू लागल्याने शहरी भागाचे महत्व महाराष्ट्राच्या एकूणच राजकारणात वाढले आहे. 2001 च्या जनगणनेनुसार शहरी लोकसंख्या 42.40: शहरी भागात वास्तव्य करत आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण अशा दोन गटात महाराष्ट्राचे राजकारण विभागले गेले आहे.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये महाराश्ट्रातील 2004–09 व 2001–03 या कालावधीत स्थानिक शासन संस्थेच्या महानगरपालिका निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये महानगरपालिका राजकारणात कोणती स्थित्यंतरे झाले, कोणत्या पक्षांना किती मते मिळाली, शहरी व ग्रामीण राजकारणावर कोणते परिणाम झाले याचा तुलनात्मक अभ्यास कला आहे.

महानगरपालिकांतील पक्षनिहाय मतांची टककेवारी

| पक्ष | सन 2004–2009 | सन 2001–2003 |
|---|---|---|
| कॉग्रेस | 22.71% | 24.93% |
| राष्ट्रवादी कॉग्रेस | 16.06% | 17.84% |
| भारतीय रिपब्लिकन पार्टी | 01.26% | 00.58% |
| शिवसेना | 15.81% | 16.27% |
| भारतीय जनता पक्ष | 10.56% | 15.24% |
| महाराष्ट्र नवनिर्माण सेना | 05.87% | –– |
| अपक्ष | 05.42% | –– |
| इतर | –– | 00.77% |

षिवसेनेची महानगरपालिका निवडणूकीतील कामगिरी (2004–2009)

| अ. नं. | महानगरपालिका | जागा | जिंकलेल्या जागा | मते %(2004–09) | जिंकलेल्या जागांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई (बृहन) | 227 | 84 | 22.71 | 37.00 |
| 2 | ठाणे | 116 | 48 | 25.47 | 41.37 |
| 3 | नवी मुंबई | 90 | 14 | 22.79 | 15.55 |
| 4 | कल्याण–डोंबिवली | 107 | 29 | 20.94 | 27.10 |
| 5 | उल्हासनगर | 76 | 16 | 17.07 | 21.05 |
| 6 | भिवंडी–निजामपूर | 84 | 14 | 11.41 | 16.66 |
| 7 | मिरा–भाईंदर | 79 | 05 | 10.47 | 06.32 |
| 8 | नाशिक | 108 | 26 | 15.32 | 24.07 |
| 9 | मालेगांव | 72 | 07 | 07.67 | 09.72 |
| 10 | धुळे | 67 | 16 | 17.78 | 23.88 |
| 11 | जळगांव | 69 | 01 | 02.51 | 01.44 |
| 12 | अहमदनगर | 65 | 18 | 22.29 | 27.69 |
| 13 | पुणे | 144 | 20 | 09.31 | 13.88 |
| 14 | पिंपरी–चिंचवड | 105 | 04 | 08.26 | 03.80 |
| 15 | संगली–मिरज–कुपवाड | 74 | 00 | 00.69 | 00 |
| 16 | सोलापूर | 98 | 09 | 11.99 | 09.18 |
| 17 | कोल्हापूर | 77 | 01 | 02.78 | 01.29 |
| 18 | औरंगाबाद | 99 | 26 | 16.21 | 26.26 |
| 19 | नांदेड–वाघला | 73 | 09 | 11.52 | 12.32 |
| 20 | अमरावती | 81 | 11 | 12.32 | 13.58 |
| 21 | अकोला | 71 | 07 | 07.70 | 09.85 |
| 22 | नागपूर | 136 | 08 | 03.04 | 05.88 |
| | एकूण टक्केवारी | 2118 | 373 | 15.81 | 15.81 |
| | एकूण मिळवलेली मते | | | 16,81,932 | |
| | एकूण मते | | | 1,06,33,760 | |

शिवसेना या प्रादेशिक पक्षाने 2004–09 व 2001–2003 या दरम्यान महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये एकूण मताच्या 16: मते ही शहरी भागात मिळवलेली दिसतात. म्हणजेच जवळ जवळ 84: शहरी मते ही शिवसेनेच्या नियंत्रणाबाहेर आहेत.

16: पेक्षा जास्त मते प्राप्त केलेल्या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. मुंबई, ठाणे, नवीमुंबई, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, धुळे, अहमदनगर व औरंगाबाद, याचाच अर्थ असा की, एकूण 22 महानगरपालिकांपैकी आठ महानगरपालिकांमध्ये 16: मते शिवसेना हा पक्ष मिळवू शकतो.

15 ते 20: मते प्राप्त करणा–या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. मुंबई ;बृहनद्धए ठाणे, नवी मुंबई, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नाशिक, धुळे, अहमदनगर व औरंगाबाद. या महानगरपालिकांमध्ये शिवसेना पक्ष हा शिवसेनेच्या

सरासरी मतांच्या जवळ आहे. शिवसेनेच्या सरासरी मतांपेक्षा खूपच कमी मते असलेल्या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. भिवंडी, निजामपूर, मिरा–भाईंदर, मालेगांव, जळगांव, पुणे, पिंपरी–चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड–वाघला, अमरावती, अकोला व नागपूर.

कोणत्याही महानगरपालिकांमध्ये शिवसेनेला 25.37ः पेक्षा जास्त मते मिळालेली दिसत नाही म्हणजेच शिवसेनेचा उगम हा शहरी भागातून झालेला असला तरी या पक्षाला शहरी भागावर आपल्या पक्षाचे निर्णायक नियंत्रण प्रस्थापित करता आलेले दिसत नाही.

***भारतीय जनता पक्षाची महानगरपालिका निवडणुकीतील कामगिरी (2004–2009)***

| अ. नं. | महानगरपालिका | जागा | जिंकलेल्या जागा | मते %(2004–09) | जिंकलेल्या जागांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई (बृहन) | 227 | 28 | 08.69 | 12.33 |
| 2 | ठाणे | 116 | 05 | 05.16 | 04.31 |
| 3 | नवी मुंबई | 90 | 01 | 02.39 | 01.11 |
| 4 | कल्याण–डोंबिवली | 107 | 16 | 13.51 | 14.95 |
| 5 | उल्हासनगर | 76 | 11 | 13.36 | 14.47 |
| 6 | भिवंडी–निजामपूर | 84 | 04 | 04.29 | 04.76 |
| 7 | मिरा–भाईंदर | 79 | 09 | 15.13 | 11.39 |
| 8 | नाशिक | 108 | 14 | 10.44 | 12.96 |
| 9 | मालेगांव | 72 | 00 | 00.88 | 00 |
| 10 | धुळे | 67 | 03 | 05.12 | 04.47 |
| 11 | जळगांव | 69 | 09 | 18.94 | 13.04 |
| 12 | अहमदनगर | 65 | 12 | 13.81 | 18.46 |
| 13 | पुणे | 144 | 25 | 13.19 | 17.36 |
| 14 | पिंपरी–चिंचवड | 105 | 09 | 08.19 | 08.57 |
| 15 | संगली–मिरज–कुपवाड | 74 | 00 | 00 | 00 |
| 16 | सोलापूर | 98 | 15 | 11.99 | 09.18 |
| 17 | कोल्हापूर | 77 | 01 | 02.42 | 01.29 |
| 18 | औरंगाबाद | 99 | 21 | 10.28 | 21.21 |
| 19 | नांदेड–वाघला | 73 | 03 | 08.21 | 04.10 |
| 20 | अमरावती | 81 | 15 | 13.04 | 18.51 |
| 21 | अकोला | 71 | 11 | 14.12 | 15.49 |
| 22 | नागपूर | 136 | 55 | 24.61 | 40.44 |
| | एकूण टक्केवारी | 2118 | 267 | 10.56 | 10.56 |
| | एकूण मिळवलेली मते | | | 11,23,853 | |
| | एकूण मते | | | 1,06,33,760 | |

महाराष्ट्रातील महानगरपालिकांमधील निवडणुकींत भारतीय जनता पक्षाला एकूण मताच्या 15ः मते ही शहरी भागात प्राप्त झालेली दिसून येतात. याचाच अर्थ जवळ जवळ 85ः मते ही भारतीय जनता पक्षाच्या नियंत्रणाबाहेर आहेत असे दिसून येते.मिरा–भाईंदर, जळगाव, सोलापूर, नागपूर या चार महानगरपालिकांमध्ये एकूण 22 महानगरपालिकांपैकी 15ःमते ही भारतीय जनता पक्ष मिळवू शकतो.

10 ते 15ः मते प्राप्त करणा–या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नाशिक, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, अमरावती, अकोला या महानगरपालिकांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सरासरी मताच्या जवळ आहे.

भारतीय जनता पक्षाच्या सरासरी मतापेक्षा खूपच कमी मते असलेल्या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. मुंबई (बृहन), ठाणे, नवी मुंबई, भिवंडी–निजामपूर, धुळे, पिंपरी–चिंचवड, कोल्हापूर आणि नोंदेड–वाघला. 25ः पेक्षा जास्त मते भारतीय जनता पक्षाला कोणत्याही महानगरपालिकांमध्ये मिळालेली दिसत नाही. म्हणजेच भारतीय जनता पक्ष हा शिवसेनेचा मित्रपक्ष व युती असला तरी देखील शहरी भागावर आपले निर्णायक नियंत्रण प्राप्त करु शकत नसलला दिसतो. यामुळे शिवसेना–भाजप ही एक शक्ती कॉंग्रेस ही दुसरी शक्ती व राश्ट्रवादी कॉंग्रेस ही तिसरी शक्ती आहे. या तीन शक्तींमध्ये राजकीय स्पर्धा आहे. तिचे वर्णन तीन पायाची स्पर्धा असे या आधी सुहास पळशीकर यांनी केले होते तेच वर्णन 2007 मध्ये ही लागू होते.

***महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची महानगरपालिका निवडणुकीतील कामगिरी (2004–2009)***

| अ. नं. | महानगरपालिका | जागा | जिंकलेल्या जागा | मते %(2004–09) | जिंकलेल्या जागांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई (बृहन) | 227 | 07 | 10.43 | 03.08 |
| 2 | ठाणे | 116 | 03 | 05.94 | 02.58 |
| 3 | नवी मुंबई | 90 | 00 | 00 | 00 |
| 4 | कल्याण–डोंबिवली | 107 | 00 | 00 | 00 |
| 5 | उल्हासनगर | 76 | 02 | 04.31 | 02.63 |
| 6 | भिवंडी–निजामपूर | 84 | 00 | 00.25 | 00 |
| 7 | मिरा–भाईंदर | 79 | 04 | 06.38 | 05.06 |
| 8 | नाशिक | 108 | 12 | 12.97 | 11.11 |
| 9 | मालेगांव | 72 | 02 | 03.80 | 02.77 |
| 10 | धुळे | 67 | 00 | 00 | 00 |
| 11 | जळगांव | 69 | 01 | 01.59 | 01.44 |
| 12 | अहमदनगर | 65 | 02 | 08.17 | 03.07 |
| 13 | पुणे | 144 | 08 | 07.74 | 05.55 |
| 14 | पिंपरी–चिंचवड | 105 | 00 | 02.26 | 00 |
| 15 | संगली–मिरज–कुपवाड | 74 | 00 | 01.16 | 00 |
| 16 | सोलापूर | 98 | 00 | 00.60 | 00 |
| 17 | कोल्हापूर | 77 | 00 | 00 | 00 |
| 18 | औरंगाबाद | 99 | 00 | 00 | 00 |
| 19 | नांदेड–वाघला | 73 | 01 | 00 | 01.36 |
| 20 | अमरावती | 81 | 00 | 00 | 00 |
| 21 | अकोला | 71 | 01 | 02.14 | 01.40 |
| 22 | नागपूर | 136 | 02 | 00 | 01.47 |
| | एकूण टक्केवारी | 2118 | 45 | 05.87 | 5.87 |
| | एकूण मिळवलेली मते | | | 6,24,215 | |
| | एकूण मते | | | 1,06,33,760 | |

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने 2004–2009 दरम्यान महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणूकीमध्ये एकूण मतांच्या 6ः मते ही शहरी भागात मिळवलेली दिसून येतात. म्हणजेच 94ः शहरी भागातील मते ही मनसेच्या नियंत्रणाबाहेर असलेली दिसतात. 6ः पेक्षा जास्त मते मिळविलेल्या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. मुंबई ;बृहनद्धए मिरा–भाईंदर, नाशिक, अहमदनगर, पुणे, याचाच अर्थ असा होतो की, महाराश्ट्रातील एकूण 22 महानगरपालिकांपैकी केवळ पाच महानगरपालिकांमध्ये 6ः मते मनसे मिळवू शकतो.

4 ते 8ः मते मिळविणा–या महानगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. ठाणे, अहमदनगर, मिरा–भाईंदर, पुणे, या महानगरपालिकांमध्ये मनसे महाराष्ट्र नवनिर्माण सेना सरासरी मतांच्या जवळ आहे. मनसेला कोणत्याही महानगरपालिकांमध्ये 13ः पेक्षा जास्त मते मिळालेली दिसत नाही म्हणजेच मनसेला देखील शहरी भागावर निर्णायक नियंत्रण प्राप्त करता येवू शकले नाही.

म्नसे हा मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या त्रिकोणातील पक्ष आहे. या पक्षाला या त्रिकोणाच्या बाहेर शहरी भागात जास्त विस्तार करता आलेला नाही.

***निष्कर्ष :–***

महाराष्ट्राच्या राजकारणात स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुकांमुळे नवे बदल होवु लागले आहेत. सुरूवातीस दोन पक्षांमध्ये राजकीय स्पर्धा दिसून येत होती. नंतर मात्र ही राजकीय स्पर्धा चौरंगी झालेली दिसते. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना व भारतीय जनता पक्ष यांच्यातील चौरंगी राजकीय स्पर्धेमुळे व आघाडयामुळे द्विध्रुवीयकरण झालेले दिसून येते.

कॉंग्रेस पक्षाला निम्म्यांपेक्षा जास्त महानगरपालिकांमध्ये शहरी भागात भक्कम समर्थक मिळू शकले नाहीत, त्यामुळे कॉंग्रेस पक्षाचे शहरी राजकारणावर नियंत्रण नाही.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला देखील महानगरपालिकांमधील निवडणुकांमध्ये शहरी भागावर आपले निर्णायक नियंत्रण प्रस्थापित करता आले नाही. आर.पी.आय. या पक्षाची देखील महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये शहरी

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-1, July-2013

भागांवरील नियंत्रण अपयशी ठरल्याने त्यांच्या मतांमध्ये फार मोठी घसरण झालेली दिसून येते.
भाजप, शिवसेना ही एक शक्ती, दुसरी कॉंग्रेस शक्ती आणि तिसरी राष्ट्रवादी कॉंग्रेस शक्ती अशा या तीनही शक्तींमध्ये राजकीय स्पर्धा आहे.

***संदर्भ सूची :***

1.अहवाल (2004–2009)एस्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र
2.अहवाल (1994–2003)एस्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र
3.पळशीकर सुहास व बिरमल नितिन (संपादक), (2004), महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
4.पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास (संपादक), महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे.